Ph.D. M.Phil Unit
Inward No.: 1470
Date : 13/02/19

# महाराष्ट्र शासन

## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिसस/उशि/पुवि/२०१८-१९/शिष्यवृत्ती/ 618 दिनांक : १२.०२.२०१९

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक क्र. 959
दिनांक - 12/2/2019
जावक दिनांक - 13/2/2019
विभाग - PG

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलवरुन प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/२११६ दि. ११.०२.२०१९.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी **महाडीबीटी पोर्टल** वर शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यात येतात. त्यानुसार कार्यालयीन संकेतस्थळावर तसेच ईमेलद्वारे पाठविण्यात आलेल्या विविध परिपत्रकान्वये सर्व महाविद्यालय/संस्था/विद्यापीठांना वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**तथापि सद्यस्थितीत आपल्या महाविद्यालयामधील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना व इतर शिष्यवृत्तीसाठी विशेषत: विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज खूप कमी प्रमाणात प्राप्त झालेले निदर्शनास येत आहे. सदरची बाब ही अत्यंत गंभीर आहे.**

**प्राप्त अर्जांची संख्या ही कमी असलेल्या संबंधित** महाविद्यालयातील प्राचार्य **व शिष्यवृत्ती संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची बैठक घेऊन, महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. २८.०२.२०१९ असून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी शक्य तितक्या लवकर अर्ज भरणेसाठी कळविण्यात यावे. कोणत्याही महाविद्यालयामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.**

Dy. R. (P.G.)

12/2

तरी याबाबत पुनःश्च कळविण्यात येते की, शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने भरण्याची अंतिम मुदत दि. २८.०२.२०१९ असून पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज शक्य तितक्या लवकर भरणेसाठी कळविण्यात यावे. तसेच महाविद्यालयाच्या क्लर्क लॉगिन आणि प्रिंसिपल लॉगिन वर खूप जास्त प्रमाणात ऑनलाईन अर्ज प्रलंबित आहेत. तरी सर्व महाविद्यालयांनी क्लर्क लॉगिन आणि प्रिंसिपल लॉगिन वरील प्रलंबित ऑनलाईन अर्ज तपासणी करुन तात्काळ पुढील कार्यवाहीसाठी फॉरवर्ड करावेत. तसेच विद्यार्थ्यांच्या लॉगिन वरील स्कीमसाठी पात्र झालेले परंतु ॲप्रुवलसाठी पाठविण्यात न आलेले अर्ज तात्काळ फॉरवर्ड करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात. यासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी विशेष कार्यशाळा आयोजित करावी. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास दि. १५.०२.२०१९ पर्यंत कळविण्यात यावा.

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

Ph.D./M.Phil Unit
Inward No.: 1459
Date: 12/02/19

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१
web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक /क्र.आर/ 949
दिनांक - 9/2/2019
आवक दिनांक - 12/2/19 (PG)
विभाग -

क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/ 2116 दि. ११/०२/२०१९

11 FEB 2019

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय :- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालयातील प्राचार्यांच्या बैठक घेणेबाबत...**

संदर्भ:- १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ३३२/तांशि-४, दि. ०७.१०.२०१७
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ४०७/तांशि-४, दि. २२.०२.२०१८
३. शासन निर्णय क्र.जीएडी-मातंस-२०१८/सीआर १३८/एस.१/३९, दि. १२.१०.२०१८
४. संचालनालयाचे दि. १९.९.१८, दि. ४.१०.१८, दि. ११.१०.१८, दि. १५.१०.१८, दि. १७.१०.१८, दि. १९.१०.१८, दि. २३.१०.१८, दि. २८.१०.१८, दि. १.१२.१८, दि. १०.१२.१८, दि. ११.१२.१८, दि. १३.१२.१८, दि. १९.१२.१८, दि. २१.१२.१८, दि. २७.१२.१८, दि. ३१.१२.१८, दि. ४.०१.१९, दि. ९.०१.१९, दि. १०.०१.१९, दि. १४.०१.१९, दि. १६.०१.१९, दि. ०१.०२.१९, दि. ८.०२.१९ रोजीचे पत्रे.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. याबाबत डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र. ३ वरील संचालनालयाच्या विविध पत्रान्वये वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि सद्यस्थितीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना व इतर शिष्यवृत्तीसाठी **विशेषत: विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण शास्त्र अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तींचे अर्ज खूप कमी प्रमाणात प्राप्त झालेले निदर्शनास येत आहे.** सदरची बाब ही अत्यंत गंभीर आहे.

**तरी याबाबत आपल्या विभागातील ज्या महाविद्यालामधून पात्र विद्यार्थ्यांच्या तुलनेत कमी प्रमाणात अर्ज प्राप्त झाले आहेत, अशा महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी प्रोत्साहन देण्यात यावे. तसेच संबंधित महाविद्यालयातील प्राचार्य व शिष्यवृत्ती संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची बैठक घेऊन, महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. २८.०२.२०१९ असून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी शक्य तितक्या लवकर अर्ज भरणेसाठी कळविण्यात यावे.** तसेच संबंधित महाविद्यालयामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. याबाबत सर्व संबंधित महाविद्यालयांना सूचना देण्यात याव्यात.

तसेच केलेल्या कार्यवाहीचा महाविद्यालय निहाय एकत्रित अहवाल दि. १५.०२.२०१९ पर्यंत संचालनालयास पाठविण्यात यावा.

DY.R.(P.G.)
12/2

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner